# पाटण परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास

**अग्रणी महाविद्यालय अंतर्गत सादर केलेला संशोधन प्रकल्प**

Research Project Submitted to Lead College Under Research Promotion Activity for College Students


**संशोधक विद्यार्थी**

कु. श्रुती सर्जेराव शिर्के

कु. पल्लवी पांडुरंग शिर्के

कु. जागृती विठ्ठल सोनावले

बी. ए. III (मराठी)

**मार्गदर्शक**

डॉ. विनायक राऊत

M. A., B. Ed., M. Phil., Ph. D.

**विभाग मराठी विभाग**

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण

अग्रणी महाविद्यालय

जिल्हा सातारा


**एप्रिल २०२४**

# पाटण परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास

**अग्रणी महाविद्यालय अंतर्गत सादर केलेला संशोधन प्रकल्प**

Research Project Submitted to Lead College under Research Promotion Activity for College Students


**संशोधक विद्यार्थी**

कु. श्रुती सर्जेराव शिर्के

कु. पल्लवी पांडुरंग शिर्के

कु. जागृती विठ्ठल  सोनावले

बी. ए. III (मराठी)

**मार्गदर्शक**

डॉ. विनायक राऊत

M. A., B. Ed., M. Phil., Ph. D.

**विभाग मराठी विभाग**

**अग्रणी महाविद्यालय बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण**

जिल्हा सातारा,


**एप्रिल २०२४**

# DECLARATION

We hereby declare that the project work entitled "पाटण परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास " completed and written by us. It has not previously formed the basis for award of any Degree or Diploma work or any other similar work.

Project Advisor

(Dr. V. S. Raut)

Research Students

1) Ku. Shruti Sarjerao Shirke

2) Ku. Pallavi Pandurang Shirke

3) Ku. Jagruti Vitthal Sonawale

B. A. III. (Marathi)

Place: Patan

Date: 29/04/2024

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled "पाटण परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास " which is being submitted herewith for the carried out project work under Lead College Activity of Shivaji University Kolhapur is the result of the original research work, completed by four students viz.

Ku. Shruti Shirke, Ku. Pallavi Shirke, Ku. Jagruti Sonawale under my supervision and guidance and to the best of my knowledge and belief the project work embodied in this project report. It has not formed earlier the basis for the award of any Degree or Diploma work or any other similar work.

Place: Patan

Date: 29/04/2024

(Dr. V. S. Raut)
Project Advisor

# पाटण परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1 | लोकसाहित्य व स्त्रीलोकगीते | १ ते ७ |
| 2 | पाटण परिसरातील नृत्यखेळगीते | ८ ते १४ |
| 3 | पाटण परिसरातील सण उत्सवाची गीते | १५ ते २५ |
| 4 | पाटण परिसरातील श्रमगीते व विधिगीते | २६ ते ३२ |
| 5 | उपसंहार | ३३ ते ३५ |
| 6 | संदर्भ | ३६ |
| 7 | परिशिष्ट | ३७ |

# पाटण परिसरातील स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास.

## प्रकरण क्रमांक १

## लोकसाहित्य व स्त्रीलोकगीते

**प्रस्तावना :-**

भाषा ही अभिव्यक्तीसाठी निर्माण झालेली एक व्यवस्था आहे. माणूस आपल्या भावभावना भाषेच्या माध्यमातून अभिव्यक्त करत असतो. या अभिव्यक्तीसाठी मौखिक आणि लिखित अशा दोन मार्गांचा अवलंब होताना दिसतो. त्यातील मौखिक परंपरा ही लिखित परंपरेच्या तुलनेने खूपच प्राचीन असल्याचे दिसते. कोणत्याही भाषेतील समग्र साहित्याचा अभ्यास करीत असताना त्या भाषेतील लिखित वाङमयाच्या अभ्यासासोबत मौखिक परंपरेने चालत आलेल्या साहित्याचा अभ्यास करणेही  महत्त्वाचे ठरते. ही मौखिक साहित्याची जी शाखा आहे त्याचा अभ्यास 'लोकसाहित्य' या विद्याशाखेमध्ये केला जातो. मराठीमध्ये वि. का. राजवाडे, चिं. ग. कर्वे, रा. चिं. ढेरे, सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, प्रभाकर मांडे, तारा भवाळकर, विश्वनाथ शिंदे इत्यादी अनेक अभ्यासकांनी या क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. लोकसाहित्याच्या परंपरेचा शोध मौखिक आणि ग्रंथनिविष्ठ किंवा लिखित परंपरेच्या आधारे घेता येतो. या संदर्भात गुणाढ्य व वररुची यांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतात कारण गुणाढ्याने विंध्य पर्वतातील वनचरांच्या कथांचा संग्रह केला आणि वररुचीने स्त्रियांमध्ये रूढ असलेली गीते संस्कारित करून म्हटल्याचे संदर्भ येतात. म्हणून 'वररुची हा लोकगीतांचा प्राचीन प्रचारक आहे', असे दुर्गा भागवत म्हणतात.

लोकांनी निर्माण केलेले 'लोकांचे साहित्य' ते 'लोकसाहित्य' असे लोकसाहित्याबद्दल म्हटले जाते. अनेक पाश्चात्य आणि भारतीय अभ्यासकांनी लोकसाहित्याचा अभ्यास करून, सैद्धांतिक स्वरूपाचे लेखन करून 'लोकसाहित्य' ही संज्ञा स्पष्ट केलेली आहे. लोकसाहित्याच्या विविध व्याख्यांच्या आधारे लोकसाहित्याचे स्वरूप व व्याप्ती सांगितलेली आहे. त्यापैकी लोकसाहित्याच्या काही व्याख्या अभ्यासू.

**लोकसाहित्याच्या व्याख्या -**

**चिं. ग. कर्वे** यांच्या मते '' पुरातन काळापासून चालत आलेले व बहुधा तोंडातोंडी असलेले वाङ्मय, गाणी, म्हणी, कोडी, यांना लोकसाहित्य असे म्हणता येईल.'' चिंग कर्वे आपल्या व्याख्येच्या माध्यमातून लोकसाहित्याच्या मौखिक तिकडे विशेष लक्ष केंद्रित करताना दिसतात त्याचबरोबर ते विविध वांग्मय प्रकार जे मौखिक आविष्काराने व्यक्त होत होते अविस्कृत होत होते त्याकडेही निर्देश करतात.

**डॉ. सरोजिनी बाबर** लोकसाहित्याच्या संदर्भात म्हणतात, ''विविध प्रकारांच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यानपिढ्या आपल्या नव-नवोन्मेषशलिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे ते लोकसाहित्य.'' लोकसाहित्याच्या अत्यंत महत्त्वाच्या अभ्यासक डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकसाहित्यातील गेयता अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच अशिक्षितांचे साहित्य असूनही ते प्रत्येक वेळी नव्या तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करून त्यांच्यावरती वेगवेगळया प्रकारचे संस्कार करण्यास कशा पद्धतीने सक्षम आहे याकडे त्या निर्देश करतात.

**डॉ. प्रभाकर मांडे** लोकसाहित्याची व्याख्या करताना ''लोकसाहित्य लोकप्रतिभेचा आविष्कार असतो. तसेच लोकांच्या पारंपरिक जीवनाचा संदर्भ दडलेला असतो. लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते. त्यातून समाजमानस अभिव्यक्त होते.'' अशी करतात लोकसाहित्याचे जेष्ठ अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्य आणि जीवन यांची एकवाक्यता सांगण्याचा प्रयत्न प्रस्तुत व्याख्यातून केल्याचा आपणास निदर्शनास येते त्यातून समूह मनाचा किंवा लोकमानसाचा अविष्कार होतो. वास्तविक पाहता लोकसाहित्याचे हे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य त्यांनी अधोरेखित केलेले आहे कारण लोकसाहित्य ही मुलतः समूहमनाची निर्मिती असते.

**डॉ. रा. चिं. ढेरें**च्या मते लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडत असले तरी लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती नव्हे. लोकसाहित्याशिवाय इतरही अनेक आविष्कारांतून लोकसंस्कृतीचे दर्शन

घडते, ते म्हणतात, ''लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक आणि प्रमुख साधन आहे हे खरेच, परंतु लोकसाहित्येतर वाङ्मयीन सामग्रीतून लोकसंस्कृतीच्या प्रदीर्घ प्रवाहाचे समग्र दर्शन घेता येते.'' लोकसाहित्याचे आणि लोकसंस्कृतीचे जेष्ठ अभ्यास डॉ. रा. चिं. ढेरे आपल्या व्याख्येच्या माध्यमातून लोकसंस्कृतीमध्ये लोकसाहित्याचे असणारे महत्त्व अधोरेखित करतात त्याचबरोबर लोकसंस्कृतीची व्यापकता लोकसाहित्याहूनही जास्त असल्याचे त्यांनी या ठिकाणी नमूद केल्याचे दिसते.

**दुर्गा भागवत** यांनी ''लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल यांचे निरीक्षण करायचे तर ते लोकसाहित्यातच करावे. मानव व त्याच्या सभोवारची चराचर सृष्टी हिचे नाते लोकसाहित्याच्या अभ्यासानंतर विशेष लक्षात येते.'' असे मत मांडले आहे.

एकंदरीत उपरोक्त सर्व व्याख्यांच्या माध्यमातून अभ्यासकानी लोकसाहित्याच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु लोकसाहित्याची परिपूर्ण व्याख्या करणे हे अत्यंत अवघड काम आहे. या सर्व व्याख्यांच्या माध्यमातून लोकसाहित्याचा एक चेहरा मोहरा आपणांसमोर प्रस्तुत होताना दिसतो. त्यातून लोकसाहित्याच्या स्वरूपाची चर्चा केलेली आहे. या विविध व्याख्या लक्षात घेता असे स्पष्ट होते की, लोकसाहित्य ही अनामिकांची निर्मिती असून लोकजीवनाचा, लोकसंस्कृतीचा, लोकमानसाचा शाब्द आणि मौखिक आविष्कार करणारी कला आहे. लोकसाहित्य ही समग्र समाजमनाची निर्मिती असते, याचा प्रत्यय येतो. सदर संशोधन हे स्त्रियांच्या लोकगीतांच्या अनुषंगाने करावयाचे असल्याने लोकगीतांचा विचार प्रस्तुत ठिकाणी होणे योग्य आहे. म्हणून स्त्रीलोकगीतांचा अभ्यास करू.

**स्त्रीलोकगीते -**

लोकसाहित्यामध्ये लोककथा, लोकगीते, लोकरूढी, लोकमानस, लोकविधी, यातुविधी, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, कोडी या सर्वांचा समावेश होताना दिसतो. हे साहित्य प्रदेशातील

स्थानिक संदर्भ घेऊन येताना दिसते. लोकसाहित्याच्या समृद्धीमध्ये स्त्रियांचे योगदान खूप मोलाचे आहे कारण पहाटे उठून जात्यावर ओव्या गाणारी आणि त्या ओव्यांच्या माध्यमातून संस्कार करणारी घरातील स्त्रीच होती. आपल्याला दैनंदिन जीवनात होणाऱ्या यातना, दुःख हे गीताच्या माध्यमातून श्रमपरीहाराच्या भावनेतून लोकसाहित्याद्वारेच अभिव्यक्त होत होते म्हणून लोकसाहित्याच्या समृद्धीमध्ये स्त्रियांचे योगदान खूप मोलाचे असल्याचे निदर्शनास येते. स्त्रियांनी निर्माण केलेली लोकगीते अभ्यासल्याने तत्कालीन समाजजीवनाचे अनेक संदर्भ, रूढी, प्रथा, परंपरा, सणवार, उत्सव, वेगवेगळे खेळ यांचा प्रत्यय येतो या लोकगीतांच्या प्रेरणा अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

लोकगीतांची व्याख्या करताना **सरोजिनी बाबर** लिहितात, ‘विविध प्रकारच्या जातीवंत स्वर विलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचलेले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यानपिढ्या आपल्या नवनवोन्मेष शालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत असे लोकगीताविषयी म्हणावयास हरकत नाही. हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसांच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय. या व्याख्याच्या माध्यमातून त्यांनी लोकगीतातील अलंकारिकतेला त्याचबरोबर गेयता, प्राचीनता, मौखिकता, नाविन्यता अधोरेखित करण्याचे काम केलेले आहे. लोकगीत हे भावगीत असते परंतु ते समूहमनाची अभिव्यक्तीही असते हेही महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. लोकगीते निर्माण होण्यापाठीमागे काय कारणे असावीत ? किंवा त्याच्या प्रेरणा काय असाव्यात ? याचाही विचार करणे या ठिकाणी गरजेचे आहे.

**लोकगीताच्या प्रेरणाः**

लोकगीतांच्या निर्मितीच्या नेमक्या प्रेरणा कोणत्या त्यांची निर्मिती कोणत्या हेतूने झाली असावी याचा विचार करताना लोकगीतांच्या निर्मितीच्या अनेक प्रेरणा निदर्शनास येतात. लोकगीतांच्या निर्मितीमागे स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील प्रेरणा बहुतांशी समान आहेत. त्यामध्ये

**1) विधीसंबद्ध प्रेरणा:** प्राचीन काळी आदिम जीवन जगणाऱ्या मानवाला भोवताली घडणाऱ्या चमत्कारिक व अद्भूत गोष्टींची जाणीव होत गेली. या घटनांमागे एखादी शक्ती असून ही शक्ती सृष्टीतील विधायक व विध्वंसक गोष्टी घडवून आणत असावी. मग या शक्तीला प्रसन्न करुन घेण्यासाठी काही विधी केले जाऊ जागले. त्या विधींच्या प्रयोजनामागे असणारी भावना प्रकट करण्यासाठी ज्या गेय रचना झाल्या त्या म्हणजे लोकगीते होत. म्हणजे विधीशी असणारा संबंध हा लोकगीत निर्मितीमागील महत्त्वाची प्रेरणा ठरते.

**2) श्रमपरिहार:** आपले मन आपणाला आवडणाऱ्या संगीतामध्ये गुंतवून ठेवल्यास कष्टाचे कामही सहज करता येते. यामागे आपण केलेल्या कष्टाचा विसर पडण्याचा म्हणजेच श्रमपरिहाराचा महत्त्वाचा हेतू असतो. या हेतूनेच स्त्री आणि पुरुष कष्टाची कामे करत असताना गीते म्हणताना आढळतात. किंबहुना कष्टाच्या वेळी एक प्रकारचा ध्वनी आपल्या मुखातून एकाच वेळी बाहेर पडताना आढळतो. एखादे काम रूक्ष, रटाळ असेल, ताकद खर्च करणारे असेल तर अशा वेळेस श्रम हलके होण्याकरिता गाणी म्हटली जातात. श्रम करताना गाणी म्हटली जातात; तशीच दिवसभराचा थकवा घालवण्यासाठीही रात्री सगळे शेतकरी बांधव एकत्र येऊन गाणी म्हणतात. स्त्रिया प्रामुख्याने दळण- कांडण व तत्सम कामे करताना गाणी म्हणतात.

**3) मनोरंजन:** मन आनंदी असताना आपल्या मुखातून संगीताचे स्वर बाहेर पडत असतात. हे गुणगुणणे काही वेळा असंबधही असू शकते. यातूनच विविध सण उत्सवांच्या निमित्ताने आनंदाने गाणी म्हटली जातात गणपती, दिवाळी, होळी, अशा ठराविक सणांना पुरुष गाणी म्हणतात. तर नागपंचमी, गौरी, हादगा अशा विविध सणांवेळी स्त्रिया गाणी म्हणतात.

**4) अद्भूततेचे आकर्षण:** मानवी मनाला अद्भुततेचे गुढ आकर्षण असल्याचे दिसते. लौकिक जीवनापेक्षा पारलौकिक जीवनाकडे मानवाचा ओढा असतो. यातून कितीतरी लोकगीतांचा जन्म झालेला आहे. हीसुद्धा एक महत्त्वाची प्रेरणा लोकगीत निर्मितीमागे असल्याचे दिसते.

लोकगीतांचे हे दालन खूप समृद्ध असून त्यात आशय, रचना आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने विविधता आहे. लोकगीताची निर्मिती प्रारंभी विधीच्या निमित्ताने झाली असावीत. नंतरच्या काळात विधीव्यतिरिक्तही लोकगीते म्हटली जाऊ लागली असावीत.

**लोकगीतांचे वर्गीकरण -**

उपरोक्त विविध प्रेरणांमधून लोकगीतांची निर्मिती झाली असावी. या पार्श्वभूमीवर लोकगीतांची विविधता पाहता त्यांचे काटेकोर वर्गीकरण करणे फार कठीण आहे. कारण हे वर्गीकरण सर्वसमावेशक असणार नाही. असे असले तरी लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकगीतांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

लोकगीतांच्या निर्मिती प्रक्रियेवर विचार मांडताना लोकसाहित्याचे अभ्यासक ना रा शेंडे म्हणतात की "लोकगीते हा तर लोक साहित्याचा आत्मा आहे मौखिक परंपरेने चालत आलेल्या व लोक जीवनाचा अविष्कार घडविणाऱ्या लोकगीतांचे वर्गीकरण आशय व अभिव्यक्ती त्याचप्रमाणे लोकगीत गाणाऱ्या व्यक्ती यात विविधता असल्यामुळे लोकगीतांचे निर्दोष आणि शास्त्रीय दृष्ट्या वर्गीकरण घडते"

लोकगीतांचे वर्गीकरण करताना प्रामुख्याने प्रादेशिकता जाती जमाती लोकगीत गाणारे स्त्री पुरुष विधि लोकगीतांची रचना इत्यादी तत्त्वांचा आधार घेतला जातो अशा स्वरूपाच्या वर्गीकरणातही काही उणीवा राहतातच.

प्रादेशिक तत्वावर लोकगीतांचे वर्गीकरण करताना शहरी विभागातील लोकगीते ग्रामीण भागातील लोकगीते आणि दऱ्या-खोऱ्यातील, रानावनात राहणाऱ्या आदिवासी व वन्य जमातींची लोकगीते असेही वर्गीकरण करता येते लोकगीते म्हणणाऱ्यांच्या आधार तत्त्वानुसार लोकगीतांचे पुरुषांची लोकगीते स्त्रियांची लोकगीते व लहान मुलांची गाणी असेही वर्गीकरण करता येते शिवाय अशा वर्गीकरणात वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी, रायरंद, पांगुळ इत्यादींच्या गीतांचा समावेश होतो. जातीय तत्त्वाच्या आधारे लोकगीतांचे वर्गीकरणात भिलारी, आधांची, मातंगाची, वैदू, कैकाडी, बेलदार इत्यादी जाती जमाती लोकगीतात विविधता आढळून येते.

लोकगीते ही निरक्षराची रचना असून मौखिक परंपरेने ती एका पिढीकडून  दुसऱ्या पिढीकडे  चालत आलेली असते. ती जशी एकट्याने म्हटली जातात तशी समूहाने देखील म्हटली जातात. स्थळ-काळपरत्वे त्याच्यामध्ये बदल होतात त्यामुळे ती जुनीही नाहीत आणि नवीही नाहीत. त्यातून लोकसंस्कृतीचे नवे दालन अभ्यासासाठी उपलब्ध होईल. स्त्रियांच्या लोकगीतांचे वर्गीकरण ढोबळमानाने  खालीलप्रमाणे करता येते.

| **नृत्यखेळगीते** | **सणउत्सवाची गीते** | **श्रमगीते** | **विधीगीते** |
|---|---|---|---|
| हादगा, फुगडी, झिम्मा, फेराची इ | नागपंचमी, गौरी गणपती इ. | जात्यावरची गाणी दळण, कांडण इ | जन्म, विवाह, पाळणा इ. |

**समारोप-**

परंपरेने स्त्रियांच्या तोंडी ज्या ओव्या, गीते चालत आलेली आहेत. त्या मौखिक रूपाने संक्रमित झालेल्या पाहायला मिळतात. स्त्रियांनी आपल्या भावभावनांना मोकळी वाट करून देण्यासाठी ओवी या छंदाचा प्राधान्याने वापर केला आहे. स्त्रिया सुखदुःखाच्या, संसाराच्या, ओव्या गातात. ही गीते लुप्त होऊ नयेत ती जतन केली जाणे आवश्यक आहेत.

**संदर्भ** –

१. लोकसाहित्याची रूपरेखा , दुर्गा भागवत वरदा बुक्स मुंबई -१९७२

***

# प्रकरण क्रमांक २

# पाटण परिसरातील नृत्यखेळगीते

आनंद व्यक्त करण्याचे सर्वोत्तम माध्यम म्हणजे गुणगुणणे त्याचबरोबर नृत्य करणे. भारतीय संस्कृतीतील कोणत्याही सण उत्सवाच्या निमित्ताने पूर्वपर अनेक खेळ खेळले जातात. ते खेळ खेळत असताना गाणी म्हणत नृत्य केले जाते. हा आविष्कार समूह मनातून अभिव्यक्त होत असताना त्यामध्ये एक प्रकारची लयबद्धता, तालबद्धता येताना दिसते. जणू सर्वांना शिकवल्यासारखे नृत्य करत असतात. अशा प्रकारची खेळगीते आजही मोठ्या प्रमाणात पाटण परिसरात खेळली जातात. महिला विविध सणवार उत्सवाच्या निमित्ताने अनेक नृत्यखेळगीते सादर करताना आढळतात. ही नृत्यखेळगीते मनोरंजन म्हणूनही खेळली जातात तशीच ती धार्मिक व सामाजिकदृष्ट्या महत्वाची असतात.

**नृत्यखेळगीते :-**

झोपाळ्यावरची ओवी, फेरावरची गाणी, विविध सण उत्सव समारंभाच्या निमित्ताने स्त्रिया जेव्हा एकत्र येतात त्यावेळेस काही खेळगीते सादर करतात. फुगडी, कोंबडा, झिम्मा अशी नृत्यखेळ गीते म्हटली जातात. या खेळ गीतांना नृत्याची साथ लाभलेली असते. मनोरंजन हा त्यांचा निखळ प्रधान हेतू मानला जातो. हादगा किंवा भुलोबा, भुलाबाई हा अश्विन महिन्यात सर्वत्र खेळला जातो. तत्कालीन सामाजिक स्थितीचे चित्रणही भोंडल्याच्या गाण्यांमध्ये दिसून येते. या गाण्यामधून कौटुंबिक नातेसंबंध, तरल भाव छटांचे दर्शन घडते. ही गाणी स्त्रीच्या सर्जनशक्तीचे महत्व विशद करणारी आहेत. समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या मनाची झालेली कुचंबना, तिने रंगवलेली स्वप्ने यांचे प्रत्ययकारी चित्रण त्या गीतातून घडते. फेर गीतामध्ये बाहेरचे वर्तुळ किंवा बाहेरचा फेर हा मोठ्या स्त्रियांचा असतो. तर आत छोट्या मुलींनी फेर धरलेला असतो. दोन स्त्रिया गीतांची एक ओळ म्हणतात बाकीच्या स्त्रिया पाठीमागून तीच ओळ पुन्हा म्हणतात. एकमेकींचे हात हातात घेऊन गोल फिरत फिरत कधी उजवा हात पायापर्यंत खाली नेत पुन्हा वर घेत अशा पद्धतीने सर्वांची हालचाल एकदम होत असल्याने फेर चांगलाच आकर्षक वाटतो.

**उदा. हादगा गीत :-**

एक लिंबू झेलू बाई  दोन लिंबं झेलू । दोन लिंबं झेलू बाई  तीन लिंबं झेलू ।।

चार लिंबं झेलू बाई  पाच लिंबं झेलू ।पाच लिंबाचा पानवठा ।।

माळ घालीतो हनुमंता ।   हनुमंताची निळी घोडी  ।।

येता-जाता कमळीतोडी । कमळाच्या पाठीमागे लागली राणी ।।

अगगं राणी इथं कुठे पाणी । चिल्लाऱ्या बाळाला भूक लागली ।।

सोन्याच्या शिंपेने दूध पाजले ।  रेशमाच्या घडीने तोंड पुसले

निज निज बाळा वेल्हाळा । आम्ही जातो वरच्या माळा

सात खडे आणूया  । एक एक खडा मोठा  ।  गौराईच्या पोटा  ।

गौराई तुझं जाणं गं  । आता कधी येण गं ।  आता येणे चैत्रमास ।

चैत्रा चैत्रा लवकर ये । हस्त घालीन हस्ताला  । देव बसविण देव्हारा

देवाऱ्याच्या चौकटी  ।  उठता बसता संकष्टी ।

**हादग्याची गीते**

हादग्याची गीते आज का हा खेळ अश्विन महिन्यात सर्वत्र खेळला जातो. हत्तीचे चित्र काढून किंवा हादग्याची फांदी ठेवून त्याची पूजा केली जाते. ही एक निसर्ग शक्तीचीच पूजा असते. या खेळात पाच पन्नास स्त्रिया एकत्र येऊन फेर धरतात. बाहेरचे वर्तुळ मोठ्या स्त्रियांचे, तर आतील लहान मुलींचे असते. दोन स्त्रिया गीतांची पहिली ओळ म्हणतात बाकीच्या त्यांच्या पाठीमागून री ओढतात. ही गाणी अर्थपूर्ण व कथात्म स्वरूपाची असतात. आपल्या दबलेल्या भावनांना त्या गीतातून मोकळी वाट करून दिली जाते.  प्रत्येक दिवशी गाण्याची संख्या एकाने वाढते व सोळाव्या दिवशी त्याचा समारोप होतो. पाटण परिसरात आढळणारी काही हादग्याची गीते पुढील प्रमाणे

१)

श्री भगवंता कमलाकांता  असं कसं वेड माझ्या कपाळी आलं ॥

वेड्याच्या बायकोने केल्या होत्या शेवया

तिकडून आला वेडा त्यांने निरखुनी पाहिले

आळया आळया म्हणून त्याने फेकूने दिले

श्री भगवंता कमलकांता असे कसे वेड माझ्या कंपाळी आलं ॥

वेड्याच्या बायकोने केले होते लाडू

तिकडून आला वेडा त्याने निरखून पाहिले

चेंडू चेंडू म्हणून त्याने खेळायला नेले

श्री भगवंता कमलाकांता असे कसे वेड माझ्या कपाळी आलं ॥

वेड्याच्या बायकोने केल्या होत्या पोळया

तिकडून आला वेडा त्यांनी निरखुनी पाहिले

चक्र चक्र म्हणून त्याने खेळायला नेले

श्री भगवंता कमलकांता असं कसं वेड माझ्या कंपाळी आलं

वेड्याची बायको झोपली होती पलंगावर

तिकडून आला वेडा त्यांनी निरखुनी पाहिले

मेली मेली म्हणून त्याने जाळून टाकली

श्री भगवंता कमलकंता असं कसं वेड माझ्या कंपाळी आलं

२)

एक लिंबू झेलू बाय दोन लिंबू झेलू

दोन लिंबू झेलू बाय तीन लिंबू झेलू

चौथ्या पाचव्या लिंबाचा पानोठा

माळ घालीतो हनुमंता

हनुमंताची निळी घोडी

येता जाता कमळे तोडी

कमळाच्या पाठीमागे लागली राणी

अग अग राणी इथे कुठे पाणी

नव्हे यमुना जमुना यमुना

जमुनाची बारीक वाळू

चिलारी बाळाला भूक लागली

सोन्याच्या शिपी ने दूध पाजले

पाटावरच्या गादीवर निजविले

निज रे निज रे चिल्लारी बाळा

मी तर जाते सोनार वाडा

सोनार दादा सोनार दादा

हादग्याची मूर्ती घडवली काय

घडवली पण दाखवली नाय

3)

बाजारातून आणला एकच आंबा

त्याचे केले सुरेख लोणचे

ते लोणचे मामाजींना वाढले

मामाजींनी मला शाबासकी दिली

ती शब्बासकी तांब्यात भरली

तो तांब्या  गंगेला वाहिला

गंगेने मला पाणी दिले

ते पाणी शेताला वाहिले

शेताने मला गवत दिले

ते गवत गाईला चारले

गाईने मला दूध दिले

ते दूध मोराला पाजले

मोराने मला पिसे दिली

ती पैसे गरुडाला दिली

गरुडाने मला बुटी दिली

ती बुट्टी माळणीला दिली

माळणीने मला फुले दिली

ती फुले हादग्याला वाहिली

हादग्याने मला प्रसाद दिला

तो प्रसाद खाऊन टाकला

४)

शिवाजी आमचा राजा त्याच्याच तोरण किल्ला

तोरणा किल्ल्यावर सात सात वेली

सात सात वेलींना एक एक फुल

एक फुल तोडीले भवानी मातेला अर्पण केले

भवानी माता प्रसन्न झाली

प्रसन्न होऊन तलवार दिली

तलवार घेऊन आला हिंदूंचा राजा तो झाला

हिंदूंच्या राजाचे स्वागत करावे

हादग्या पुढे गाणी म्हणावी

हादग्याचा प्रसाद खाऊन टाकावा

५)

आड बाय अडवणी

आडाचं पाणी काढोनी

आडात होती देवळी

देवळीत होता साबण

आमचा हादगा बामन

आठ बाय अडवणी

आडाच पाणी कढोनी

आडात होती देवळी

देवळीत होता खराटा

आमचा हदगा मराठा

आड बाय अडवणी

आडाच पाणी कढोनी

आडात होती देवळी

देवळीत होती सुपारी

आमचा हादगा दुपारी

आठ बाय अडवणी

अडाच पाणी कढोनी

आडात होती देवळी

देवळीत होती कात्री

आमचा हादगा रात्री

श्री भगवंता कमलकांता हे अतिशय प्रसिद्ध असणारे हादग्याचे गीत आहे ते लोकप्रिय व मनोरंजकही आहे. वेड्याची बायको आपल्या नशिबाचे भोग या गीतातून विनोदी पद्धतीने सांगते. वेड्याच्या बायकोने शेवया केल्या तर वेड्याने अळया म्हणून त्या फेकून दिल्या तिने लाडू केले तर त्यांनी चेंडू म्हणून ते खेळायला नेले तिने पोळया केल्या तर त्याने चक्र म्हणून खेळायला नेले बायको पलंगावर झोपलेली पाहून वेडा तिला मेली असे समजून जाळून टाकतो अशा प्रकारचे हे विनोदी गीत गात असतात.

अशाच प्रकारचे दुसरे अतिशय गाजलेली गीत म्हणजे एक लिंबू झेलो बाई दोन लिंबू झेलू या गाण्यातून कौटुंबिक नातेसंबंधातील तरल भावनांचे दर्शन घडते बाजारातून आणलेला आंबा त्याचे लोणचे मामंजींना दिले त्यांनी शाबासकी देणे गंगेने पाणी देणे शेताने गवत देणे गाईने दूध देणे मोराने पिसे देणे गरुडाने बुटी देणे माळीने फुले देणे आणि ती हदग्याला वाहने असा निसर्गातील अनेक घटकांचा एकमेकांशी असणारा संबंध या गीतातून व्यक्त झाला आहे.

छत्रपती शिवरायांच्या कर्तृत्वाचे गुणगान करणारेही एक गीत या हादग्याचे निमित्ताने गायले जाते तोरणा किल्ला भवानी मातेची तलवार छत्रपती शिवरायांचे राज्याभिषेक या गोष्टींचा उल्लेख या गीतात आलेला पाहायला मिळतो.

**समारोप -**

लोकसंस्कृती संस्कारसक्षम असते यात शंका नाही. आजच्या आपल्या प्रगत आणि व्यापक समाजाचा पाया हा अनेक लोकपरंपरेतून सामर्थ्यशील झाला आहे. भारताचे विकसित स्वरुप लोककला, लोकपरंपरा, लोकसाहित्य याने समृध्द असण्याचे कारण ग्रामीण भागातून अजूनसुद्धा आवश्यक अशा जुन्या चालीरुढी, लोकगीते साहित्याच्या माध्यमातून जपली जात आहेत. लोककला हे लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. समूहमन आविष्कृत होते ते लोककला, लोककथा, लोकगीतांमधून लोककला कालसंवादी, सहजस्फूर्त आणि उस्फूर्त असतात. पारंपरिकता हा या कलांचा गुणविशेष असतो. आणि या सर्वांमध्ये नृत्य खेळ गीतांचे बहुमोल असे योगदान आपणास पाहायला मिळते.

***

# प्रकरण क्रमांक ३

# पाटण परिसरातील सणउत्सवाची गीते

सण आणि उत्सवप्रियत ही मराठी माणसाच्या मनाचा संवेदनशील कोपरा आहे. आजही अनेक शहरांमधून गौरी-गणपतीच्या, होळीच्या निमित्ताने रेल्वे गाड्या भरून आपल्या गावाकडे जाणाऱ्या लोकांची गर्दी पाहिल्यानंतर याचा प्रत्यय येतो. माणसांच्या मनातील सणांचे, उत्सवांचे, यात्रांचे आकर्षण हे भारतीय मनाचे एक वेगळे वैशिष्ट्य मानावे लागेल. भारतीय संस्कृतीत सणांना अत्यंत महत्त्व आहे हे सर्व सण निसर्गाशी अनुकूल राहून साजरे होताना दिसतात आजही लोक भक्तीभावाने, श्रद्धेने एखादे व्रत पाळताना दिसतात. उदा.  श्रावणात शुद्ध पंचमीस नागपंचमीचा सण साजरा केला जातो. नागाला, लाह्या, दूध यांचा नैवेद्य दाखवितात. पांढरी फुले वाहतात. तेव्हाही अनेक स्त्रिया गावाबाहेर जाऊन उंच झाडाला झोके बांधतात झोक्याचे खेळ खेळतात. फेर धरून नाचतात वेगवेगळी गाणी उत्स्फूर्तपणे म्हणतात.

उदा.   "चला गं सये वारुळाला। नागोबाला पुजायला।

हळद कुंकू वाहायला। ताज्या लाह्या वेचायाला।"

पाटण परिसरातही हे चित्र पहावयास मिळते. पाटण तालुका हा ग्रामीण, डोंगराळ असणारा तालुका आहे. त्याचे भौगोलिक स्थान कोकणच्या प्रवेशद्वारावर आहे.  त्याचबरोबर सातारा, कराड, महाबळेश्वर, शिराळा, चिपळूण या तालुक्यांनी वेढलेला आहे. या तालुक्यात कोयना, पाटण, मोरगिरी, मल्हारपेठ, तारळे आणि ढेबेवाडी हे मुख्य विभाग आहेत. या परिसरातही विविध सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात.

नागपंचमी, गौरी-गणपतीच्या उत्सवाच्या निमित्ताने स्त्रिया झिम्मा, फुगड्या, झोके इत्यादी खेळ खेळत असतात. हे खेळ खेळताना सामूहिक गीतेही म्हटली जातात." सर्व जातीच्या, सर्व वयाच्या, स्त्रिया मुली या फेऱ्याच्या गाण्यात आनंदाने सहभागी होतात. कौटुंबिक, सामाजिक पातळीवरील जनजीवन, विचार, श्रद्धा, समजुती, संकेत यांचेही दर्शन यातून घडते. समाज आणि कुटुंबातील नातेसंबंध यातील  विविध भावछटा या गाण्यातून व्यक्त होतात.

**गौरीगीते :-**

भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणेश चतुर्थीच्या निमित्ताने घरोघरी गणपतीचे आगमन होते. त्यानंतर दोन दिवसांनी गौरीचे आगमन होते. हा उत्सव महाराष्ट्रामध्ये मनोभावे आणि अतिशय उत्साहाने साजरा केला जातो. या सणाच्या निमित्ताने गौरीचे आगमन, त्यानंतर त्यांचे पूजन, त्यांच्यासाठी नैवेद्य आणि तिसऱ्या दिवशी गौरीचे विसर्जन. तीन दिवसांचा हा गौरीचा उत्सव व त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची आराधना त्या आराधनेच्या माध्यमातून गौरी आवाहन, गौरी पूजन, गौरी विसर्जन असे वेगवेगळे विधी पार पाडले जात असतात. या गौरींना आणण्यासाठी आणि घालवण्यासाठीसुद्धा प्रत्येक गावातील स्त्रिया, मुली उत्साहाने गावातील नदीच्या काठावरून गौरी वाजत गाजत आणतात त्यानिमित्ताने वेगवेगळ्या प्रकारची गीते समूह भावनेतून आविष्कृत होताना दिसतात. गौरीचे कान उघडणे, रात्रीचे खेळ त्यामध्ये गाठोड, नटूशी व आटूशी ,पान फुगड्या, फेर धरले जातात, घागर फुंकणी, सुपाचा खेळ असे विविध खेळ महिला खेळत असतात. तेव्हा त्या स्त्रिया विविध गीते म्हणत असतात. त्यातील काही गीते पुढील प्रमाणे.

१)

रत्ना मागली तुळस किती ग पानांनी फुलस
साकळयाच्या भारोबर आमची गवराई लवस
रत्ना मागली तुळस किती ग पानांनी फुलस
पैंजनाच्या भारोभार आमची गवराई लवस
रत्ना मागली तुळस किती ग पानांनी फुलस
पुतळयाच्या भारोभार आमची गवराई लवस
रत्ना मागली तुळस किती ग पानांनी फुलस
वजरटिकीच्या भारोभार आमची गवराई लवस
रत्ना मागली तुळस किती ग पानांनी फुलस
नथीयाच्या भारोभार आमची गवराई लवस
रत्ना मागली तुळस किती ग पानांनी फुलस

फुल्याच्या भारोभार        आमची गवराई लवस

२)

रांजण तळ्यावरी गवराई धुणं धुती

तिच्या ग पैंजणाला सूर्य चमक देती

चमक चमक साडीला गुलाबी रंग माडीला

रांजण तळ्यावरी गौराई धुणं धुती

तिच्या ग जोडव्याला सूर्य चमक देती

चमक चमक साडीला गुलाबी रंग माडीला

रांजण तळ्यावरी गौराई धुणं धुती

तिच्या ग डोरल्याला सूर्य चमक देती

चमक चमक साडीला गुलाबी रंग माडीला

रांजण तळ्यावरी गौराई धुणं धुती

तिच्या ग चुड्याला सूर्य चमक देती

चमक चमक साडीला गुलाबी रंग माडीला

रांजण तळ्यावरी गौराई धुणं धुति

तिच्या ग नथीला सूर्य चमक देती

चमक चमक साडीला गुलाबी रंग माडीला

रांजण तळ्यावरी गौराई धुणं धुति

तिच्या कुडीला सूर्य चमक देती

चमक चमक साडीला गुलाबी रंग माडीला

३)

घाल ग गौरी झगडा गौरी झगडा

पैंजणाचा पाय तुझा दिसतो उघडा

घाल ग गौरी झगडा गौरी झगडा

बांगड्याचा हात तुझा दिसतो उघडा

घाल ग गौरी झगडा गौरी झगडा

डोरल्याचा गळा तुझा दिसतो उघडा

घाल ग गौरी झगडा गौरी झगडा

बुगड्याचा कान तुझा दिसतो उघडा

४)

गौराई माईला बोलवा माईला बोलवा

तिला पैंजण घडवा, पैंजण घडवा

तिच्या पायात चढवा पायात चढवा

गौराई माझिया माईला  बोलवा माईला  बोलवा

तिला डोरलं घडवा डोरलं घडवा

तिच्या गळयात चढवा गळयात चढवा

गौराई माईला  बोलवा माईला  बोलवा

तिच्या तिला पुतळ्या घडवा पुतळ्या घडवा

तिच्या गळयात चढवा गळयात चढवा

५)

गौरी माया बहिणी ग कधी येशील ग

पाऊस पडेल गंगा भरेल येईन

मी भदव्यात ग येईन भादव्यात ग

भोपळीच्या फुलावरून जाईन मी

तालुक्यात ग जाईन मी तालुक्यात ग

गौरी माया बहिणी ग कधी येशील ग

पाऊस पडेल गंगा भरेल येईन

मी भदव्यात ग येईन भादव्यात ग

वाळकीच्या फुलावरून जाईन मी

तालुक्यात ग जाईन मी तालुक्यात ग

गौरी माया बहिणी ग कधी येशील ग

पाऊस पडेल गंगा भरेल येईन

मी भदव्यात ग येईन भादव्यात ग

दहीहंडीच्या पुलावरून जाईन मी

पाऊस पडेल गंगा भरेल येईन

मी भदव्यात ग येईन भादव्यात ग

६)

झिम्मा खेळू झिम्मा

माझ्या जुन्याला झाली रात्र ग झाली रात्र

शंकराच्या देवळात ग देवळात

आमचा शंकर नखरेदार ग नखरेदार

त्याच्या रथाला चक्र चार ग चक्र चार

चारी चक्रांना ८० मोती ग ८० मोती

ऐंशी मोत्यांना ८० नाकगं ऐंशी नाक

पोरी झिम्म्याला खाली वाकगं खाली वाक

झिम्मा खेळू झिम्मा

माझ्या जिम्म्याला झाली रात्र ग झाली रात्र

गणपतीच्या देवळात ग देवळात

आमचा गणपती नखरेदार ग नखरेदार

त्याच्या रथाला चक्र चार गं चक्र चार गं

चारी चक्रांना ८० मोती ग ऐंशी मोती

ऐंशी मोत्यांना ८० नाक ग ऐशी नाक

पोरी झिम्म्याला खाली वाक गं  खाली वाक

झिम्मा खेळू झिम्मा

माझ्या जिम्म्याला झाली रात्र ग झाली रात्र

भैरीच्या देवळात ग देवळात

त्याच्या रथाला चक्र चार ग चक्र चार

चारी चक्रांना ८० मोती ग ८० मोती

ऐंशी मोत्यांना ८० नाक्या ऐंशी नाक

पोरी झिम्म्याला आली वाकड खाली वाक

७)

गणव्या गुलाल उधळीतो

गणव्या गुलालाचा भार

माझं पैंजण झालं लाल

नको ग सयानो

गणव्या गुलाल उधळीतो

गणव्या गुलालाचा भार

माझं डोरलं झालं लाल

नको ग सयानो

गणव्या गुलाल उधळीतो

गणव्या गुलालाचा भार

माझी जोडवी झाली लाल

नको ग सयानो

गौरीच्या सणाच्या निमित्ताने गावातील स्त्रिया एकत्र येऊन गौरीची गीते म्हणतात त्यात गौराई रांजण तळयावर धुणं धुती त्यावेळी तिच्या पैंजण जोडवी डोरले चुडा नथ कुडी यावर

सूर्याची किरणे पडतात आणि तिचेही सहभागीय अलंकार चौकून उठतात रांजण तळ्यावर गौराई धुणं धुती आणि चमक चमक साडीला गुलाबी रंग माडीला या चरणांची वारंवार पुनरावृत्ती होते मध्ये फक्त वरील शब्दांचा किंवा वस्तूंचाच बदल केला आहे कदाचित त्यामुळेच ही गीते पाठांतराला सोपी होत असतात. पैंजण जोडवी चुडे बांगड्या बुगड्या डोरले पुतळ्या यांना या घेतात खूप मान असलेला दिसतो. या गोष्टी स्त्रियांच्या सौभाग्याची संबंधित असल्याने शिवाय गौरी ही पण एक स्त्री असल्याने स्त्री अलंकाराचा वापर वारंवार होताना दिसतो.

गौराईचे आगमन कधी होते तर भादव्यात म्हणजे भाद्रपद महिन्यात होते त्यावेळी भरपूर पाऊस पडलेला असतो नदीला गंगा भरती आलेली असते भोपळी वाळकी अशा फुलावरून ती जाईल म्हणते शंकराच्या गणपतीच्या बहिणीच्या देवळात रात्रभर झिम्मा फुगडी चा खेळ रंगतो

**नागपंचमीची गीते -**

साधारणता मुलींची लग्न जेष्ठ किंवा वैशाख महिन्यात होत असतात. बायकांना माहेरची काडीही सासरच्या माडीहून प्रिय असते त्यामुळे त्यांच्या माहेरच्या ओढीला कोणत्याच गोष्टीने मोजता येऊ शकत नाही आणि पहिल्यांदाच आषाढ पाळण्यासाठी जाणाऱ्या मुलीची ओढ तर खूपच वेगळी असते. तिच्यासाठी गगन ठेंगणे असते. तेथून परत सासरी गेल्यानंतर वेध लागतात ते नागपंचमीचे

आला बाई श्रावण सण पंचमीचा
छंद माहेराचा मला छंद माहेराचा ॥।

अशी तिची अवस्था होते. याप्रमाणेच पाटण परिसरामध्ये आढळणारी काही स्त्रिगीते पुढील प्रमाणे-

१)

आला बाई श्रावण सण पंचमीचा

छंद माहेराचा मला छंद माहेरचा

सगळ्या जावा मिळूनी गेल्या

सर्वच आपल्या माहेराला

जीव कसा लागेल इथे एकटीचा

झुळझुळ गंगा जैसी

प्रेमळ माझी आई तैशी

बालपणी पाजविते पाना अमृताचा

हळूहळू गाडी घुंगराची

घेऊनी आला माझा मुराळी

खिडकीतून पाहते मी रस्ता बांधवाचा

२)

नागपंचमी नागाची बहीण भावाची

चंद्राला राही झाली ग बाई

आज मला माहेरी जायचं हाय

बाप माझा कसा विठ्ठल जसा

त्याच्याशी दोन शब्द बोलायचं आहे

नागपंचमी नागाची बहीण भावाची

चंद्राला राही रुई झाली ग बाई

आज मला माहेरी जायचं हाय

आई माझी कशी रुक्मिणी जशी

तिच्याशी कुशीत झोपायचं हाय

बहीण माझी कशी ग चंद्रभागा जशी

तिच्याशी झिम्मा फुगडी खेळायची हाय

भाऊ माझा कसा पुंडलिक जसा

त्याच्याशी हितगुज बोलायचं हाय

3)

आला पंचमीचा सण

झालं अधीर हे मन

वारुळाला जाऊया ग

नागराजाला ग बाई दूध दही वाहू या

सडा घालुनी अंगणात

घे घरदार सारवा

बांधा तोरण दरवाजाला बाई शोभा वाढवा

गोड निवद  करा ग वाटी दुधान भरा

त्याला मान देऊया ग

नागराजाला ग बाई दूध दही वाहूया

या सासरच ओझं देवा बाजूला

नागपंचमीच्या सणी  त्याची पूजा करूया

चला वारुळाला जाऊया ग वारुळाला जाऊया

४)

पाची  फड्यांचा नागोबा फड्यांचा नागोबा

पडला ग माझ्या पायावरी दीर मनवितो वहिनी

साखळ्या कशाने मोडील्या कशाने मोडील्या

तुमचं काय गेलं आमच्या पित्याने घडविल्या

पाची  फड्यांचा नागोबा फड्यांचा नागोबा

पडला ग माझ्या पायावरी दीर मनवितो वहिनी

जोडवी कशाने मोडली कशाने मोडली

तुमचं काय गेलं आमच्या पित्याने घडविली

पाची  फड्यांचा नागोबा फड्यांचा नागोबा

पडला ग माझ्या पायावरी दीर म्हणवितो वहिनी

पट्ट्या कशाने मोडील्या कशाने मोडील्या

तुमचं काय गेलं आमच्या पित्याने घडविल्या

पाची  फड्यांचा नागोबा फड्यांचा नागोबा

५)

वारुळाला जाऊया नागोबाला पुजूया

या ग या सयानो ओवाळते बायांनो

वारुळाला जाऊया नागोबाला पुजुया

शिवशंभूचा हार गळ्याचा तो भूमीचा स्वामी

हे नागराजा आज आली तुझी नागपंचमी

शिव शंभूचा हार गळ्याचा तो भूमीचा स्वामी

हे नागराजा आली तुझी नागपंचमी

तुझ्या विषयाचे अमृत होते भक्ती रसाच्या नामी

हे नागराजा आज आली तुझी नागपंचमी

आपला भाऊ मुरळी होऊन आपल्याला नेण्यासाठी येईल म्हणून ती त्याच्या येण्याच्या रस्त्याकडे डोळे लावून बसलेली असते. आपला बाप विठ्ठलासारखा आई रुक्मिणीसारखी बहीण चंद्रभागेसारखी तर भाऊ पुंडलिकासारखा तिला वाटतो. माहेरी गेल्यानंतर बापाशी बोलायचं असतं आईच्या कुशीत झोपायचं असतं बहिणीबरोबर झिम्मा फुगडी खेळायची असते, मैत्रिणींची ही ओढ लागलेली असते तर भावाबरोबर हितगुज करायचं असतं.

नागपंचमीच्या सणाला स्त्रिया नागालाही भाऊच मानतात. त्याच्यासाठी उपवासही करतात. त्याला दही दूध वाहण्यासाठी जातात सासरच ओझं बाजूला ठेवून हा सण अतिशय आनंदाने साजरा करतात.

पाच खड्याचा नागोबा आपल्या पायावर पडल्याने आपले पैंजण जोडवी साखळ्या मोडल्या कशाने मोडल्या असे दिराने विचारतात ती अभिमानाने सांगते की हे सर्व माझ्याच पित्याने घडविलेले आहे हे गीत प्रश्नोत्तर स्वरूपात असलेले पाहायला मिळते

कृषी संस्कृतीत नागोबाला मानाचे स्थान आहे. शिवशंभूच्या गळ्यातला तो हार भूमीचा स्वामी आहे. भक्तीरसाने त्याच्या विषाचेही अमृत होते असा तिचा श्रद्धा भाव आहे.

**समारोप -**

सण उत्सव प्रियतेतुनही आपल्या भोवतालच्या परिसराशी असणारे नाते व्यक्त करणारी अनेक गीते स्त्रियांकडून अभिव्यक्त होत असतात. त्यांच्या मनाच्या भावावस्था त्यातून दिसून येतात. या स्त्रिया अनेक सणांची आवर्जून वाट पाहत असतात कारण तोच त्यांचा आनंदाचा ठेवा असतो आणि माहेरचा सांगावा ही असतो. एकदा माहेरला येऊन गेल्यानंतर एक प्रकारची ऊर्जा स्त्रियांना प्राप्त होताना दिसते. म्हणून कितीही वृद्ध झालेली महिला सुद्धा वर्षातून एकदा गावदेवीला किंवा देवाला नारळ देण्याच्या निमित्ताने का असेना आपल्या माहेरला येतेच माहेरला आल्यानंतर तिला मिळणारा आनंद हा खूप मोलाचा असतो. या सगळ्या गीतांच्या माध्यमातून त्या स्वतःच्या सुखदुःखांच्या हिंदोळ्यावर आनंदाने झुलताना पहावयास मिळतात. म्हणूनच या सर्व गीतांचे जतन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ -**

१ मांडे प्रभाकर, लोकपरंपरेतील स्त्री प्रतिमा, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती 2014

२ भोसले द. ता. (संपा.), लोकजीवन आणि लोकसंस्कृती, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आवृत्ती 2005

***

# प्रकरण क्रमांक ४

## पाटण परिसरातील श्रमगीते व विधीगीते

व्यक्ती तितक्या प्रकृती असे म्हटले जाते. भाषा व्यक्तीकडून वापरली जात असली तरी ती सामाजिक असते. बोलणे मात्र व्यक्तीनिष्ठ आणि संदर्भनिष्ठ असते. जेव्हा लोकसाहित्याचा अभ्यास केला जातो तेव्हा गावातील विविध देव देवतांना घातली जाणारी गाऱ्हाणी, म्हणी, वाक्प्रचार या सगळ्यातून या बोलींचे सामर्थ्य दिसते. अनेक लोककथा विविध समाजांची लोकगीते आणि लोकनाट्य वेगवेगळी आहेत वेगवेगळ्या बोलीतील लोकगीतांच्या आधारे वेगवेगळे लोकविधी संपन्न होतात.

पाटण हा दुर्गम डोंगराळ व भूकंपग्रस्त असणारा तालुका. या तालुक्याचा भूकंप प्रवणक्षेत्रामुळे औद्योगिक विकास न झाल्याने तो थोडासा मागास राहिला त्यामुळे अनेक सुख-सुविधा या तालुक्याला खूप उशिरानेच प्राप्त होत गेल्या. तरीही या तालुक्यातील जनता ही स्वकष्टावर नंदनवन फुलवणारी आहे. त्यांच्या स्वतःच्या अनेक गरजा त्यांनी भोवतालच्या निसर्गाकडून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आणि निसर्गाशी समतोल राखून स्वतःचा विकास केला. यामध्ये त्यांना श्रम घ्यावे लागले उदा.- अनेक गावांना जाण्यासाठी वेळेवर एस. टी. बसची सुद्धा सुविधा नाही. पाटण परिसरातील कै. भागाबाई यमकर नावाची एक अशिक्षीत महिला पाटण पासून कातवडीपर्यंत चालत जात असे आणि चालताना तिच्या तोंडून अनेक लोकगीते उत्स्फूर्तपणे अभिव्यक्त होत असत. या गोष्टीची दखल घेऊन या शीघ्र लोककवयित्रीचा भव्य सत्कार तत्कालीन बांधकाम मंत्री श्रीमंत विक्रमसिंह पाटणकर यांनी केल्याचे पाटण तालुक्याने पाहिलेले आहे. वास्तविक पाहता त्या स्त्रीच्या तोंडी असणारी सर्व गीते संकलन करून त्याचे पुस्तक काढले असते तर या परिसरातील एक अनमोल ठेवा जतन होण्यास मदत झाली असती.

'लोकवाङ्मयाचा आत्मा म्हणजे स्त्रीगीते व स्त्रीगीते म्हणजेच ओवीगीते असे काहीसे लोकगीतांचे स्वरूप असल्यामुळे लोकगीते आणि स्त्रियांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. मराठी स्त्रीगीतातील ओवीगीते ही स्त्रियांची निर्मिती आहे. अशा ओवीगीतातून स्त्रीजीवनाचे, त्या जीवनातील विविध भावभावनांचे, घटना-प्रसंगांचे उत्कट व भावघन चित्रण पाहावयास मिळते.'[१] मराठी लोकवाङ्मयातील लोकगीतांचे दालन समृद्ध आणि संपन्न आहे. लोकवाङ्मय म्हणजेच लोकगीते म्हणण्या इतपत लोकगीतांची संख्या विपुल आहे. लोकगीते हा तर लोकसाहित्याचा आत्मा आहे. लोकगीतात स्त्रियांच्या गीतांची संख्या भरपूर प्रमाणात उपलब्ध असलेली पाहायला मिळते. मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकगीतातून लोकजीवनाचा अविष्कार घडत असतो. लोकजीवनाबरोबरच लोकमनाने त्या मनातील विविध भावभावनांचे उत्कट दर्शन लोकगीतातून घडते.

लोकगीतांचे स्वरूप विशेष सांगताना डॉ सरोजनी बाबर म्हणतात की "विविध प्रकारच्या जातीवंत स्वर विलासांनी शिनगारलेले व अशिक्षितांनी किती वर्षामागे रचले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान पिढ्या आपल्या नवनवोन्मेशशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत असे लोकगीताविषयी म्हणण्यास हरकत नाही हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय."

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या मते मौखिक परंपरा लोकजीवनाचा आविष्कार, भावात्मकता आणि संक्रमणशीलता ही लक्षणे लोकगीतांच्या संदर्भात महत्वाची आहेत. डॉ. बाबर यांचे विचार लोकगीतांच्या स्वरूपावर प्रकाश टाकणारे आहेत. नवनवोन्मेशशालिनी तेज धारण करत असतानाच या गीतांतून श्रमपरिहाराचेही उपयोजन होत असल्याचे दिसते. आपण केलेली कष्टाची कामे गीत गायनाच्या आनंदाने कमी कष्टात होत आहेत असा आभास निर्माण होतो. मन आनंदी असल्याने कामही अधिक होते. किंबहुना काम हाता वेगळे झालेले लक्षातही येत नाही. ज्या कालखंडामध्ये कोणत्याही प्रकारचे तंत्रज्ञान नव्हते तेव्हा या श्रमगीतांनी मानवी मनाला आधार देण्याचे कार्य केले होते. म्हणून लोकसाहित्यामध्ये श्रमगीतांना विशेष महत्त्व आहे.

**श्रमगीते :-**

अंग मेहनतीचे काम करत असताना श्रम हलके व्हावे म्हणून स्त्रिया ओव्या म्हणत असतात. यामध्ये जात्यावरची ओवी, दळण-कांडण करताना म्हटली जाणारी गीते यांचा समावेश होतो. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांचे मन कायम दबलेले होते. त्याला कुठेतरी वाचा फुटावी म्हणून, क्षणभर का होईना दुःख विसरण्यासाठी गाणी म्हटली जात. या गीतामध्ये कौटुंबिक आणि सामाजिक आशय असे. स्त्रियांच्या जीवनातील विविध भावभावनांचे चित्र त्यातून दिसे.

**जात्यावरची ओवी**

आठ दिसाच्या ऐतवारी । सडा टाकीते कापराचा ॥
देव भैरी –खेतरीचा । मला शेजार बापयाचा ॥
आठ दिसाच्या ऐतवारी । सडा टाकीते कुंकवाचा ॥
देव विठ्ठल रुक्मिणीचा । मला शेजार आईयीचा ॥
आठ दिसाच्या ऐतवारी । सडा टाकीते गुलालाचा ॥
देव मुळास्नी आईचा । मला शेजार दलालाचा ॥
आठ दिसाच्या ऐतवारी । सडा टाकीते भंडाऱ्याचा ॥
देव म्हाळसा – खंडोबाचा । मला शेजार मुरळीचा ॥
आठ दिसाच्या ऐतवारी । नाही सारवला उंबरा ॥
देव भैरी खेतरीने | घोडा माघारी फिरवला ॥

**विधीगीते :-**

स्त्रियांची आणि उपासकांची गाणी ही बहुदा विधीशी संबंधाने म्हटली जातात. जन्मापासून मृत्यू पर्यंत जे विविध विधी संपन्न होतात त्या विधींना ओव्यांची, गीतांची साथ लाभलेली असते. उदाहरणार्थ- पाळणा , घाणा भरणे, मुहूर्तमेढ रोवणे, हळद लावणे, अंघोळीचा विधी, केळवण, रुखवत अशा विविध प्रकारच्या विधींच्यावेळी गाणी म्हटली. जातात आंब्याची फांदी रोवून त्या फांदीला हळकुंड, सुपारी आणि पैसे यांची पुरचुंडी बांधली जाते. यालाच मुहूर्तमेढ रोवणे म्हटले जाते. याप्रसंगी काही गीते म्हटली जातात. 'वैदिक युगात लोकगीतांचे स्वरूप कसे होते हे

निश्चितपणे सांगता येणे कठीण असले तरी वेदकाळात विधिप्रसंगी गीते गायली जात असत त्यांचे उल्लेख मिळतात. पुत्रजन्म, उपनयनविधी, तसेच विवाहादी प्रसंगी गीते गायली जात या गीतांसाठी गाथा असा शब्द आढळतो.'[२]

**घाना – मेढ्याचे गाणे :-**

य ग घाना भरीयला । सव्वा खंडीया भाताचा । नवरा उदंड गोतायचा ।

य ग घाना भरीयला । सव्वा खंडीया सुपाऱ्याचा । नवरा उदंड व्यापाऱ्याचा ।

य ग घाना भरीयला । सव्वा खंडीया खारकीचा । नवरा उदंड द्वारकेचा ।

य ग घाना भरीयला । सव्वा खंडीया डाळीयचा । नवरा पाटील आळीयचा ।

"लगीन घरामध्ये मुहूर्त मेढीचा पाया । बाळाच्या लग्नाला आली सत्वाची अनुसया ।

अशा प्रकारे देव देवतांचे आगमन आवश्यक मानले जाते. 'हळदीला' विवाह विधीमध्ये अनन्य साधारण महत्व आहे. हळद ही सौभाग्यकारक व भूतबाधा दूर करण्याचे सामर्थ्य असलेली मानली जाते. हळद लावणे हा विवाहपूर्व संस्कार आहे.

"या ग मांडवियाच्या दारी दोन्ही बाजूने लावा जाई |हळद लावीती नवऱ्या बाळाची आई |"

अशा प्रकारच्या ओवीगीतामध्ये गतिमानता आहे. एकूणच मराठी स्त्री ही भाविक आणि श्रद्धाळू असल्यामुळे विविध विधी प्रसंगी ती समरसून सहभागी होते. विविध विधी प्रसंगी उखाणा घेण्याचीही पद्धत प्रचलित असल्याचे दिसते.

**पाळणा :-**

पहिल्या दिवशी राजदरबारी | आले वंशाला अशा खेतरी

बाळ शिवाजी पहिल्या अवतारी | जो बाळा जो जो रे जो

दुसऱ्या दिवशी लावूनी केळी |न्हाऊ घालीत्या दासी सुंदरी

बाळ शिवाजी पहिल्या अवतारी | जो बाळा जो जो रे जो

तिसऱ्या दिवशी वाजला घंटा | साऱ्या नगरात आनंद मोठा

उठा बयांनो साखर वाटा | ............. जो बाळा जो जो रे जो

चौथ्या दिवशी चौथी केली | धन्य अंबिका धावून आली

जयप्राप्ती राजाला दिली | ............ जो बाळा जो जो रे जो

पाचव्या दिवशी पाचवा रंग | पाहून सेनाही बाळाला दंग

पाची हत्यारे राजाच्या संग | ..................जो बाळा जो जो रे जो

सहाव्या दिवशी लावूनी लळा | कानी कुंडल मोत्यांच्या माळा

गंध केसरी कपाळी टिळा | .................. जो जो बाळा जो जो रे जो

सातव्या दिवशी सातवी करा | जिजाबाईच्या पोटी जन्मला हिरा

त्याच्या टोपीला मोलाचा तुरा | ................ जो बाळा जो जो रे जो

आठव्या दिवशी आनंद मोठा | आले सेनापती तानाजी उठा

हाती तलवार फिरवित पट्टा | .............. जो बाळा जो जो रे जो

नवव्या दिवशी नवरत्न हिरा | जसा मोत्यांनी गुंफिल्या तारा

त्याच्या स्वरूपाचा प्रकाश सारा............... जो बाळा जो जो रे जो

दहाव्या दिवशी करुनी साज | घोड्यावरी शोभे रेशमी जीन

फोटो काढावा वरती बसून |.................... जो बाळा जो जो रे जो

अकराव्या दिवशी चला मंदिरी | पाळण्याला बंधूनी रेशमी दोरी

गाणी गाउनी हलवा सुंदरी |.................. जो बाळा जो जो रे जो

बाराव्या दिवशी बोलवा माळी | केली आरास लावून केळी

नाव शिवाजी ऐका मंडळी | ..................जो बाळा जो जो रे जो

**उखाणा :-**

कोणत्याही मंगल विधीमध्ये कोणतेही कार्य करत असताना एक सुहासिन दुसऱ्या सुहासिनीला तिच्या नवऱ्याचे नाव उखाण्याच्या माध्यमातून घेण्याचा आग्रह करते. त्यातूनही स्त्रियांची प्रतिभा दिसून येते व त्या आपल्या पतीचे नाव आपल्या सासू-सासऱ्यांसह पतीसमोरही घेण्याची नकळत मुभा तिला मिळते. हे नाव घेताना एक प्रकारचा अभिमान उखाण्याच्या माध्यमातून

व्यक्त होताना दिसतो. अनेक विधींमध्ये कोणतेही कार्य करताना अनेक प्रकारचे उखाणे या परिसरामध्ये ऐकायला मिळतात त्यातील संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे वर्णन करणारा एक उखाणा पुढील प्रमाणे-

वंदन तुला महाराष्ट्र देशा मान आमचा मराठी भाषा
अहमदनगर म्हणे मोठा मी जिल्हा अकोल्याचा मान नरनाळा किल्ला
अमरावतीत मेळघाटी वाघाचे स्थान संभाजीनगर अजिंठा एलोरा लेणी छान
योगेश्वरी देवी बीडमध्ये वसे ब्रास सिटी भंडाराची ओळख असे
गजानन महाराजांची बुलढाणा पावनभूमी ताडोबा व्याघ्र प्रकल्प आहे चंद्रपूरी
अहिराणी भाषा धुळे ची गोड बाबा आमटे यांची कर्मभूमी गडचिरोली थोर
गोंदियाचि रायसिटी म्हणून ओळख परळीच्या आवंढयानागनाथाला नमस्कार वाकून
जालन्याची ओळख किल्ला रोहिला गड जळगाववे सर्वत्र केळीचे घड
पवित्र भूमी कोल्हापुरी अंबाबाईचे मंदिर लातूरचा प्रसिद्ध किल्ला उदगीर
जग प्रसिद्ध मुंबई नगरी राजधानीचे स्थान मुंबई उपनगरात चित्रनगरी छान
मधुर संत्री चाखावीत नागपूरची नांदेड वस्ती रेणुका माहूरची
नंदुरबारचे उत्तर सीमा नर्मदा माय राखते द्राक्ष नाशिकची गोड सारे जग चाखते
धाराशिव विराजते तुळजापूरची आई पालघरचा निसर्ग प्रवाशांना खुणावी
परभणीचा मदगुलेश्वर गोदावरी पात्रामध्ये पुण्याची पेशवाई साक्ष शनिवार वाडा देते
रायगडची महती ऐकावा इतिहास रत्नागिरीचा हापूस जगात खास
सांगलीची हळद निर्मळ आणि गुणकारी सातारी कंदी पेढे जगात भारी
पर्यटनाचे केंद्र सिंधुदुर्ग नगरी सोलापूरच्या फेमस उबदार चादरी
सह्याद्री अरबी दोन्ही लागते ठाण्याला अवश्य भेट द्यावी वर्ध्याच्या गीताई मंदिरला
करंज चाहूल अभयारण्य वाशिम मधले वसंतराव नाईक यवतमाळने दिले
भाषा जरी एक तरी वेगवेगळ्या बोली खाद्यसंस्कृती अफाट पाटवाडी ते पुरणपोळी
निसर्ग कला संस्कृतीचा अभिमान या बलाढय भूमित आडूळ नगरी कुंकू माझे वसे

शिवरायांची पावनभूमी इतिहास थोर संतोष रावांचे नाव घेते कोयनेची पोर

उपरोक्त उखाणा पाहिल्यानंतर अशिक्षित स्त्रियांचे भौगोलिक आणि व्यवहारी ऐतिहासिक ज्ञान अधोरेखित होते महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातील वैशिष्ट्य या एका उखाण्यातून त्याचबरोबर स्वतःच्या गावाचा सुद्धा अभिमानाने केलेला उल्लेख हा अशिक्षित स्त्रियांच्या प्रतिभेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून समोर येतो काळा बरोबर होणारे बदल सुद्धा लोकसाहित्य मध्ये प्रतिबिंबित होताना दिसतात आज पर्यंत उस्मानाबाद नावाने ओळखला गेलेला जिल्हा महाराष्ट्र शासनाने धाराशिव केल्यानंतर ते नाव स्वीकारून लोकसाहित्य आविष्कृत होत असते.

सर्व विधी साजरे करण्यामागे संस्काराचा, रुढीपरंपरांचा भाग असतोच पण त्याचबरोबर मनोरंजन, समाज संस्कृत करणे याही गोष्टी त्यातून येतात.

**संदर्भ-**

१ लोकजीवन आणि लोकसंस्कृती डॉ. सुलक्षणा कुलकर्णी पृष्ठ 188

२ लोकसाहित्याचे स्वरूप डॉ. प्रभाकर मांडे पृष्ठ 229

***

# प्रकरण क्रमांक ५

## उपसंहार

स्त्रियांच्या या लोकगीतात चरणांची पुनरावृत्ती होत असते.  तो लोकगीताचा एक विशेषच असतो. ध्रुव पदांची वारंवार पुनरावृत्ती होत असते चरणांची पुनरावृत्ती होताना त्यातील एखादाच शब्द वस्तूची किंवा व्यक्तीचे नाव बदलते बाकी सर्व एकच असते.

पुढील चरण समान ठेवले जातात काही वेळेस निरर्थक शब्दांचाही वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. रूढी, परंपरा, रीती, रिवाज, विधी, सण-उत्सव यामध्ये गीतांना विशेष स्थान आहे आणि ही गीते पिढ्यानपिढ्या स्त्रियांनी मौखिक परंपरेने जतन करून ठेवलेली आहेत. आजही ग्रामीण भागातील स्त्रिया या लोकगीतांचे चालते बोलते संग्रह आहेत. लोकगीते कोणत्यातरी काळात कुणीतरी निर्माण केलेली असली तरी वर्तमान काळातले संदर्भही त्यात येत असतात. ही लोकगीते जुनी किंवा नवीन असत नाहीत मात्र समकालीन असतात. लोकगीते ही नेहमी समूहाच्या बोली भाषेतच असतात. ती लोकसमूहाची सामूहिक अभिव्यक्ती असते.

पाटण परिसरामध्ये आढळणाऱ्या स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष हाती लागतात.

**निष्कर्ष** :-

१) परिसरातील विविध घटना घडामोडींचा संदर्भ या लोकगीतांच्या माध्यमातून येताना दिसतो.
२) अनेक खेळगीते ही लोकसंस्कृतीचे वहन करत असतानाच स्त्रियांना शारीरिक क्षमतांमध्येही सक्षम बनवण्यासाठी समर्थ असल्याचे दिसतात. एक प्रकारचा व्यायाम सदर खेळगीतातून होताना आढळतो.
३) काही लोकगीतांतून निरर्थक शब्दांची अनावश्यक पुनरावृत्ती होताना आढळते.

४) लोकगीते ही स्त्रियांच्या उत्स्फूर्त भावनेचा अविष्कार करण्यासाठीच जन्माला आलेली दिसतात.

५) सदर खेळगीते खेळत असताना दोन स्त्रिया पहिले चरण पुढे म्हणतात तेच चरण नंतर उर्वरित सर्व स्त्रिया म्हणत असल्याने वेगळ्या पाठांतराची आवश्यकता नसते. अशाच पद्धतीने ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होताना आढळतात

६) लोकगीते ही निरीक्षरांनी निर्माण केलेली असून ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

७) या लोकगीतांमध्ये समाजजीवनातील सणसमारंभ आणि समाजमनातील भावभावनांचे दर्शन घडते.

८) यातून संस्कृती, नीतीकल्पना, कौटुंबिक जीवन, कृषी जीवन, देव देवता विषयीचे भाव भावना व्यक्त होतात.

९) प्रयोगरूपता हे लोकगीतांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असल्याने लोकगीताचा आस्वाद घेण्यासाठी केवळ श्रवणाने किंवा वाचनाने घेण्यापेक्षा त्याचे प्रयोगरूप पाहणे आवश्यक असते.

१०) गीते गाताना सुलभतेसाठी शब्दांचे उच्चारण वेगवेगळ्या प्रकारे केल्याचे दिसते.

लोकगीत म्हणजे लोकसमूहाने निर्मिलेले गीत होय. हे गीत लोक जीवनविषयक गीत असते आणि ते लोकसमूहात प्रचलित असते तरीही लोकगीताचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. मानवी जीवनातील असे एकही अंग नाही जे लोकगीतात प्रकट होत नाही या दृष्टीने लोकगीत हे लोक साहित्याचा आत्मा मानले जाते.

लोकगीते त्या त्या समाजाच्या बोलीभाषातच असतात. समूहनिष्ठा हा लोकगीतांचा विशेष असतो. पुनरावृत्ती हे लोकगीतांचे एक वैशिष्ट्य आहे. लोकगीतांची रचना साधी असते. त्या रचनेमध्ये कडवे असते आणि त्यात पालुपद असते ते तालतत्वाने भरलेले असते म्हणून ते चालीवर म्हटले जाते. लोकगीत निर्मिती विविध प्रेरणांमधून आणि विविध प्रसंगी होते. समूहाच्या विविध गरजा लोकगीतांतून पूर्ण केल्या जात असल्यामुळे लोकगीतांचे विविध प्रकार सिद्ध झालेले पाहायला मिळतात.

एकंदर मानवी जीवनातील विविध अवस्थेमध्ये लोकगीत माणसांची साथसोबत, संगत करत असते. वेळप्रसंगी लोकगीत स्त्री-पुरुषांच्या प्रणय भावना व्यक्त करते, श्रमाची कामे करताना त्यांचे श्रम हलके करते, दुःखाच्या क्षणी दुःखात सहभागी होऊन दुःखभार हलका करण्याचे काम सुद्धा लोकगीतातून केले जाते. जन्म मृत्यू विवाह अशा वेगवेगळ्या विधींच्या वेळी लोकगीत गायली जातात स्त्रियांना तर त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक घटकांमध्ये लोकगीत आधार देत असते. लोकगीत करमणूक करते, हास्य विनोद करते, वेगवेगळी धार्मिक कार्यात सुद्धा लोकगीते गायली जातात. त्यामुळे लोकगीतातील अनुभवविश्व विविधांगी असते. अगदी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत विविध क्षणी स्त्री लोकगीतांचा आधार घेत असते असे म्हटले तरी ते फारसे वावगे ठरत नाही.

***

## संदर्भ सूची

1) कुलकर्णी सुलक्षणा लेख - लोकजीवन आणि लोकसंस्कृती, भोसले द. ता. (संपा.) लोकसंस्कृती स्वरूप आणि विशेष, पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती २००४ पृष्ठ १८८

2) भोसले द. ता. (संपा.), लोकजीवन आणि लोकसंस्कृती, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आवृत्ती २००५

3) मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद तृतीयावृत्ती १९९५

4) मांडे प्रभाकर, लोकपरंपरेतील स्त्री प्रतिमा, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१४

# परिशिष्ट

## स्त्रियांच्या  लोकगीतांचे संकलन करत असताना विद्यार्थिनी



